# VJTI MUMBAI
वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिवृ/ज्ञा.सा.फु.आ.योजना/२६-२७/ ३३३२ /२०२६ दिनांक : 17 AUG 2026

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना

(इतर मागास वर्ग (OBC), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT), विशेष मागास प्रवर्ग (SBC) प्रवर्गातील वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता)

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता संस्थेतील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या OBC, VJNT & SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या तसेच भाडे तत्वावर राहत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहातील मुलां-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहीत्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी OBC, VJNT & SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता **ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना शासनाने सुरू केलेली आहे. सदर योजने अंतर्गत प्रति वर्षी ६०,०००/- इतकी रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बॅंक खात्यात थेट शासनामार्फत जमा केली जाईल.** सदर योजनेकरीता विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २,५०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे बंधनकारक आहे. योजनेचा लाभ घेण्याकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरून सदर अर्ज व संबंधित कागदपत्र **मा. सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर, प्रशासकिय इमारत भाग १, चौथा मजला, आर. सी. चेंबुरकर मार्ग, चेंबूर पू, मुंबई ४०००४१ या पत्त्यावर** जमा करावे.

अर्ज भरण्याची लिंक www.vjti.ac.in या संकेतस्थळवर सुध्दा उपलब्ध आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

अर्ज भरण्याची लिंक : **https://hmasnew.mahait.org/**

17/08/26

अध्यक्ष
शिष्यवृती समिती

प्रत : सर्व विभागप्रमुख, मुला-मुलींचे वसतीगृह, संस्थेचे संकेतस्थळ